# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११



(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

मा. ना. एकनाथरावजी खडसे, मंत्री (पा) व अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची दहावी बैठक दिनांक ३०-०७-१९९७ रोजी मुंबई येथे संपन्न झाली. बैठकीमध्ये खालील प्रमाणे ठराव पारित झाले.

ठराव क्र. १०/१

''ठराव करण्यात येतो की,

१. ९ व्या बैठकीमध्ये मंजूर झालेले ठराव क्र. ९/६ व ९/७ खालील प्रमाणे बदल करुन व वाचून कायम करण्यात येत आहेत.''

२. ठराव क्र. ९/६

''ठराव करण्यात येतो की, निविदा प्रक्रियेची कार्यवाही शासनाच्या प्रचलित पध्दती नुसार करावी.

निविदा सूचना वृत्तपत्रात देताना वृत्तपत्राची एक प्रत सर्व सदस्यांना पाठविण्यांत यावी.''

३. ठराव क्र. ९/७

''ठराव करण्यात येतो की, उपविभाग दर्जाचे महामंडळाचे एक संपर्क कार्यालय मुंबई येथे निर्माण करण्यात यावे.

अशासकीय सदस्यांसाठी नवीन आमदार निवासामध्ये एक निवासस्थान् कायमस्वरुपी आरक्षित करण्यात यावे. तसे आरक्षण न मिळाल्यास सदस्यांना प्राधान्याने आरक्षण मिळणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास विनंती करण्यात यावी.''

ठराव क्र. १०/२

''ठराव करण्यात येतो की, महसूल खात्यास पिण्याच्या पाणी पुरवठयासाठी महामंडळाकडील 'वॉटर टँकर्स' शासनाच्या मार्गदर्शक सूचनानुसार उपलब्ध करुन देण्याबाबत नियामक मंडळाच्या आठव्या बैठकीत मांडण्यात आलेला ठराव कायम करण्यात येत आहे.''

ठराव क्र. १०/३

''ठराव करण्यात येतो की, नियामक मंडळाने दि. २१.०६.९७ रोजी झालेल्या ९ व्या बैठकीमध्ये दिलेल्या सूचनांप्रमाणे महामंडळाचे १९९७-९८ या

मंत्री (पाटबंधारे) व अध्यक्ष
म. कृ. खो. वि. म. पुणे

कार्यकारी संचालक
म. कृ. खो. वि. म. पुणे

आर्थिक वर्षाचे रू. २१२४.२२ कोटीचे अंदाजपत्रक शासनाच्या पाटबंधारे विभागाच्या अंदाजपत्रकाच्या धर्तीवर तयार करण्यात आले असून सदर अंदाजपत्रक इतर महामंडळाच्या धर्तीवर तयार करुन पुन्हा सादर करावे.''

ठराव क्र. १०/४

''ठराव करण्यात येतो की, मत्स्योत्पादनाच्या लिलावा संदर्भात प्रस्तावित ठराव क्र. १०/४ वर पुढील बैठकीत निर्णय घेण्यात यावा.''

ठराव क्र. १०/४ अ

''ठराव करण्यात येतो की, महामंडळाच्या पूर्व परवानगीशिवाय मत्स्योत्पादन विभागाचे कर्मचारी व त्यांनी नेमलेले ठेकेदार यांना जलाशय क्षेत्रात प्रवेश देऊ नये.''

ठराव क्र. १०/५

''ठराव करण्यात येतो की,

अ. कुकडी प्रकल्प - डिंभे धरण - तिसरा लवाद प्रकरणी, लवादाने दिलेल्या निवाड्यानुसार वादी कंत्राटदार 'मे. नवभारत बिल्डर्स कोल्हापूर' यांना महामंडळाने त्यांचे मागणीपोटी रु. १३.५२ कोटी पैकी रु. १०.५७ कोटी (व्याज रु. २.९५ कोटी वगळून) अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

ब. लवादाच्या निर्णयानुसार रु. १३.५२ कोटी रकमेवर दि. १.४.१९९६ पासून १७ % दराने व्याज द्यावे लागणार आहे. तसेच जिल्हा न्यायालयाचे निर्णयानुसार कंत्राटदारास लवादाच्या निवाड्याची रक्कम अदा होईपर्यंत दि. २.५.९७ पासून ९ % द.सा.द.शे. दराने व्याज द्यावे लागणार आहे. या दोन्ही व्याजापोटी दि. ३०.७.१९९७ अखेर एकूण व्याजाची रु. २,७९,३६,३९१ येते. वर 'अ' मध्ये निर्देश करण्यात आलेले रु. २.९५ कोटी व रु. २.७९ कोटी अशा एकूण रु. ५.७४ कोटी या व्याजाच्या रकमेबाबत कंत्राटदाराशी वाटाघाटी करण्याचे अधिकार कार्यकारी संचालक यांना देण्यात येत असून, त्याबाबतचा अंतिम निर्णय मा. अध्यक्षांच्या संमतीने घेण्यास मान्यता देण्यात येत आहे.''

मंत्री (पाटबंधारे) व अध्यक्ष
म. कृ. खो. वि. म. पुणे

कार्यकारी संचालक
म. कृ. खो. वि. म. पुणे